# बिइंग वुमन

*Pune's only Fortnightly for Women*

१ डिसेंबर - जागतिक एड्स् दिन
२ डिसेंबर - जागतिक संगणक साक्षरता दिन
३ डिसेंबर - जागतिक विकलांग दिन
९ डिसेंबर - आंतरराष्ट्रीय भ्रष्टाचार विरोधी दिवस
११ डिसेंबर - युनिसेफ दिन

Price Rs. 18/- Pages 4 RNI No. MAHMAR/2019/78753 | Pune - Year 3, Issue 1 - 1 to 15 December 2021 (Fortnightly)







# घटनेच्या निर्मितीत महिलांचे योगदान




**जुई खोत, पुणे**
editorial@thebeingwoman.com


तत्कालीन कायदामंत्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घटना समितीत राज्यघटनेच्या मसुद्याला दिशा दिली. घटना समितीच्या प्रमुख चर्चांमध्ये त्यांचा सहभाग होता. घटना समितीत महिलांचे योगदानही मोठे होते. तेव्हा आजच्या ६९ व्या भारतीय संविधान दिनानिमित्त (२६ नोव्हेंबर १९४९) अशा कर्तृत्ववान महिलांचे स्मरण करणे गरजेचे आहे...

१) अम्मु स्वामीनाथन : केरळमधील पालघाट जिल्ह्यातील उच्च जातीच्या हिंदू कुटूंबात जन्म झालेल्या स्वामीनाथन मद्रास मतदारसंघातून संविधान सभेच्या सदस्य होत्या.

२) दक्षिणाणी वेलयुद्धन : कोचीन मतदारसंघातून संविधान सभेवर आलेल्या दक्षिणाणी वेलयुद्धन ह्या एकमेव दलित महिला होत्या.

३) बेगम अजाज रसूल : उत्तरप्रदेशच्या राजकारणावर विशेष छाप असलेल्या बेगम अजाज रसूल ह्या संविधान सभेवर आलेल्या एकमेव मुस्लिम महिला होत्या. भारत सरकारने त्यांना पद्मभूषण पुरस्काराने गौरविले होते.

४) दुर्गाबाई देशमुख : सन १९७५ मध्ये पद्मविभूषण पुरस्काराने गौरविलेल्या दुर्गाबाई देशमुख ह्या तरूण वयापासूनच सत्याग्रह चळवळीत सहभागी होत्या. सन १९३६ मध्ये त्यांनी आंध्र महिला सभेची स्थापना केली. त्या लोकसभेच्या सदस्य होत्या.

५) हंसा जीवराज मेहता : सन १८९७ रोजी जन्मलेल्या हंसा यांनी इंग्लंडमध्ये पत्रकारिता आणि समाजशास्त्र यांचा अभ्यास केला होता. १९४५ – ४६ मध्ये अखिल भारतीय महिला परिषदेच्या त्या अध्यक्ष होत्या.

६) कमला चौधरी : लखनौच्या श्रीमंत कुटूंबात जन्मलेल्या कमला चौधरी ह्यांनी आपल्या पिढीजात श्रीमंतीचा त्याग करून भारतीय राष्ट्रीय चळवळीत सहभागी झाल्या. ७० च्या दशकात त्या लोकसभेच्या सदस्य होत्या.

७) लीला रॉय : ऑक्टोबर १९०० मध्ये आसामच्या गोलपारालीला भागात जन्मलेल्या लीला रॉय यांना राजकारणाचे धडे आपल्या वडिलांकडूच मिळाले. लीला रॉय यांनी सन १९२१ मध्ये बेथून कॉलेजमधून पदवी मिळविली. सन १९२३ मध्ये आपल्या मित्रांसोबत त्यांनी दीपाली संघाची स्थापना केली आणि शाळा स्थापन केली.

८) मालती चौधरी : ओडिसाचे माजी मुख्यमंत्री असलेल्या नभकृष्ण चौधरी यांच्या पत्नी मालती चौधरी यांनी पतीसमवेत भारतीय राष्ट्रीय कॉँग्रेसमध्ये सामील होऊन स्वातंत्र्य आंदोलनात सहभाग घेतला.

९) पूर्णिमा बॅनर्जी : पूर्णिमा बॅनर्जी ह्या इलाहाबादमधील भारतीय राष्ट्रीय कॉँग्रेस कमिटीच्या सचिव होत्या. बॅनर्जी यांच्या भाषणांचा एक महत्त्वपूर्ण पैलू म्हणजे समाजवादी विचारधाराबद्दल त्यांची दृढ वचनबद्धता.


१०) राजकुमारी अमृत कौर : ऑक्सफर्ड विद्यापिठात शिकलेल्या अमृत कौर ह्या स्वतंत्र भारताच्या पहिल्या आरोग्य मंत्री होत्या. त्या अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थान (एम्स) च्या संस्थापक सदस्य होत्या.

११) रेणुका रे : आय. सी. एस. अधिकारी सतीश चंद्र मुखर्जी यांच्या कन्या असलेल्या रेणुका रे यांनी महिला व दिव्यांगांसाठी विशेष कार्य केले. संविधान सभेत रेणुका रे यांनी एकसमान वैयक्तिक कायद्याची मागणी केली होती.

१२) सरोजिनी नायडू : केंब्रिज विद्यापिठात शिकलेल्या उत्तम कवयित्री सरोजिनी नायडू ह्या आखिल भारतीय कांग्रेसच्या पहिल्या महिल्या अध्यक्षा होत्या. नायडू यांना संयुक्त प्रांताच्या प्रथम राज्यपाल होण्याचा मान जातो.

१४) सुचेता कृपलानी : भारतीय कांग्रेसचे जेष्ठ नेते आचार्य जे. बी. कृपलानी ह्यांच्या पत्नी असलेल्या सुचेता कृपलानी ह्या उत्तरप्रदेशच्या चौथ्या तर भारतातल्या पहिल्या महिला मुख्यमंत्री होत्या.

१५) विजयालक्ष्मी पंडित : संयुक्त राष्ट्रांच्या मुख्य परिषदेच्या पहिल्या महिला अध्यक्षा होण्याचा मान विजयालक्ष्मी पंडित यांना जातो. भारतीय स्वातंत्र्य चळवळीत ३ वेळा तुरूंगवास झालेल्या पंडित ह्या पंतप्रधान पंडित नेहरू ह्यांच्या भगिनी होत.




१६) एनी मास्केरेन : एनी मास्केरेन यांचा जन्म केरळमधील तिरुवनंतपुरम् येथिल लॅटिन कॅथलिक कुटुंबात झाला. त्रावणकोर राज्य कॉँग्रेसमध्ये सामील होणारी त्या पहिली महिला होत. १९३७ ते १९७७ ह्याकाळात वेगवेगळ्या कारणांसाठी त्यांनी अनेकवेळा तुरुंगवास भोगला आहे. मास्करेन १९५१ च्या भारतीय सार्वत्रिक निवडणुकीत पहिल्या लोकसभेसाठी निवडून आल्या होत्या. ●●




बिइंग वुमन
Pune's only Fortnightly for Women

# थोडक्यात...



**रोहिणी वांजपे**, संपादक - बिइंग वुमन
editorial@thebeingwoman.com

बिइंग वुमनमध्ये सर्वांचे स्वागत. साहित्यिकांची दिवाळी या बिइंग वुमनच्या विशेषांकाला उत्तम प्रतिसाद मिळाला. सर्व वाचकांचे आभार. बघता बघता दोन वर्ष पूर्ण झाली. या प्रवासातले एक एक टप्पे पार केले. वेगवेगळ्या अनुभवांनी समृद्ध झालो. अशीच आता पुढची वाटचाल सुरु झाली आणि या टप्प्यावर एका नवीन उपक्रम घेऊन येतोय, ते म्हणजे 'कारवा' हे फक्त स्वतः वस्तू तयार करणाऱ्या स्त्रियांसाठी असलेले प्रदर्शन. १७ आणि १८ डिसेंबरला एलिसियम बँक्वेट येथे हे प्रदर्शन होत आहे. याला पण चांगलाच प्रतिसाद मिळतोय. ही वेगळी संकल्पना अद्विता इन्क्युबेशनच्या सहकार्याने होत आहे. स्त्रियांनी स्त्रियांसाठी चालवलेले म्हणजेच बिझनेस करणाऱ्या स्त्रिया, गृहिणी, नोकरी करणाऱ्या स्त्रिया यांना सपोर्ट करणारे बिइंग वुमन आहे ते खऱ्या अर्थाने या प्रदर्शनाच्या निमित्ताने सिद्ध होत आहे. पुढचे वर्षभर यासारखे अनेक कार्यक्रम बिइंग वुमनकडून सादर केले जातील याची मला खात्री आहे. या अंकात भारतीय संविधानामध्ये योगदान दिलेल्या स्त्रियांविषयी माहीती आहे. आमच्यासोबत पहिल्या अंकापासून असलेल्या लेखिका तसेच नव्याने जोडल्या गेलेल्या लेखिकांचे लेख तर आहेतच आणि नेहमीची सदरे या अंकात आहेत. आता आपण पूर्णपणे नॉर्मल वातावरणात आहोत. नाटक, सिनेमे, शाळा सर्व सुरु होत आहेत. तुळशीच्या लग्नानंतर लग्नाचा सिझन सुरु झालाय आणि बिइंग वुमनचा 'वेडिंग स्पेशल' अंक येणार आहे. यामध्ये लग्न या संकल्पनेभोवती फिरणाऱ्या अनेक विषयांवर माहितीपूर्ण लेख असतीलच शिवाय लग्न या एका इव्हेंटसाठी लागणाऱ्या उद्योजकांच्या जाहिरातीसुध्दा असतील. एखादी स्पर्धाही असेल. तेव्हा पुढच्या अंकाच्या प्रतीसाठी आमच्याशी संपर्क कराच. अतिशय उत्साही वातावरणाचा अनुभव येतोय. शॉपिंग, प्रवास आणि मनोरंजन याचा अगदी मनापासून आनंद घेणे चालू आहे. हे असेच राहू दे, कोणतेही विघ्न येऊ नये अशी आशा करत नवीन वर्षाच्या स्वागताच्या तयारीला लागूया. आमच्या सर्व वाचकांनी बिइंग वुमनवर दाखवलेल्या विश्वासाला आम्ही यापुढेही असेच पात्र राहू आणि नवीन संकल्पनांचे पुढचे सर्व अंक असतील अशी खात्री देते.

●●●

# पुराणातील स्त्रिया



**अपर्णा गुळवणी, कोल्हापूर**
editorial@thebeingwoman.com

## सीता : भाग ५

१६ व्या शतकात वाल्मिकी रामायणाची लिखित आवृत्ती असूनही तुलसीदासांच्या रामचरितमानस या अवधी भाषेतील आवृत्तीमध्ये काही बदल दिसून येतात. त्यामध्ये, सीतेचे अपहरण झालेच नव्हते. जिला रावणाने अपहृत केली, ती खरी सीता नव्हतीच. ती सीता पुन्हा अग्निप्रवेशानंतर प्रकट होते असे नमूद केले आहे. तसेच, १४ वर्षांच्या वनवासानंतर आणि रावणाच्या वधानंतर, रामाचा राज्याभिषेक आणि सीतेचा अग्निप्रवेश, ह्या नंतर रामचरितमानास समाप्त झाले आहे, तर वाल्मिकींनी, त्यानंतरचे रामायण, उत्तरकांड असे म्हणून लिहिले आहे.



राम वनवानसातून परत आल्यावर राज्याभिषेक होतो आणि राम सीता यांचे जीवन आनंदात सुरु असतानाच रामाला त्याच्या प्रजेच्या असंतोषाला सामोरे जावे लागते. सीतेचा स्वीकार करणे, हे त्याच्या प्रजेला रुचत नव्हते असे त्याच्या कानावर येताच तो तिचा त्याग करतो. राम लक्ष्मणाला सांगतो की तिला गंगाकिनारी जायची इच्छा आहे, त्याप्रमाणे तिला घेऊन जा पण परत तू एकटाच ये. सीता या भ्रमात असते की आपण एक दिवसात अयोध्येला परतणार आहोत. पण तिला जेव्हा कळते की रामाने आपला प्रजेच्या इच्छेखातर आपला त्याग केला आहे, तेव्हा ती तेही स्वीकारते.

नंतर सीता, लव आणि कुश या राम पुत्रांना वाल्मीकींच्या आश्रमात जन्म देते आणि तिथेच ती मोठी होतात. काही वर्ष गेल्यावर, लव, कुश जेव्हा रामासमोर रामायण सादर करतात, तेव्हा राम सद्गतीत होऊन आपल्या मुलांना आणि सीतेला स्वीकारायला तयार होतो आणि आदेश देतो कि सीतेने आपण पवित्र आहोत हे प्रजेसमोर सिद्ध करावे.

त्याप्रमाणे सीता येते, पण स्वतःची कोणतीही बाजू न मांडता, केवळ धारिणीला विनंती करते, मी रामाशिवाय अन्य पुरुषाचा विचार केला नसल्यास मला तू कवेत घे.

आपण ह्या ४ लेखात सीतेची अनेक रूपे पाहिली. तिची इच्छाशक्ती, धर्म पाळण्याची निष्ठा, रामाप्रती तिची भक्ती, वेळ पडलीच तर रामाला ही चूक दाखवून देणारी, करारी, स्वतःची प्रतिष्ठा जपणारी आणि शेवटपर्यंत हार न मानणारी!

आपण जेव्हा रामायण वाचतो तेव्हा आपण सीतेला एक आपल्यासारखीच व्यक्ती असे मानून, तिच्या सुख दुःखात समाविष्ट होतो. पण जर भक्ती रसात न्हाऊन गेलेल्या रामचरितमानसबद्दल विचार केला तर असे दिसून येईल की राम आणि सीता हे एकमेकांपासून वेगळे नाहीच आहेत. सीता रामाची शक्ती आहे आणि शक्तीशिवाय प्रत्येक पुरुष अपूर्ण आहे. पार्वती जशी शंकराची शक्ती आहे, राधा जशी कृष्णाची, तशीच सीता रामाची. तिच्या वाटेला आलेलं दुःख, हे रामाचेही दुःख होते कारण दोघे वेगळे नव्हतेच.

तसेच जर अद्भुत रामायण वाचले तर त्यामध्ये वाल्मिकींनी सीतेला शक्तीस्वरूप म्हटले आहे. राम आणि रावणाच्या युद्धात राम जखमी होतो आणि सीता रावणाचा वध करते असे वर्णन आहे.

रामायण काय किंवा महाभारत, प्रत्येक व्यक्तिरेखा वेगवेगळ्या पैलूंनी घडवली आहे. आपल्याला जसा अनुभव येईल तसा आपण अर्थ शोधात राहतो.

# फरशी



**निलीमा क्षत्रिय, संगमनेर**
editorial@thebeingwoman.com

रमाची पुष्पामावशी फरशी पुसत होती. तिला फरशी पुसण्यात असामान्य गती आहे. त्यामुळे रमा तिला गमतीने 'पुष्पक हेलिकॉप्टर' म्हणते. गरगरगरगर करत ती फरशी पुसत असली, की ती आपली सोफ्यात पाय वर घेऊन बसून रहाते आणि तिच्यावर लक्ष ठेवते. रमाने लक्ष ठेवलं नाही तर तिला चार खोल्यांची फरशी पुसायला पाच मिनिटं लागतात आणि लक्ष ठेवलं तर सहा. कारण कितीही तिच्यावर वॉच ठेवायचा प्रयत्न केला तरी ती बरोब्बर असा काहीतरी विषय काढून रमाला गुंगवते, की फडकं दोरीवर फेकाटून ती गरगरगरगर करत परत निघते तेव्हाच ही भानावर येते.



आज फरशी पुसतापुसता पुष्पाने पूर्वीच्या सारवणाचा विषय काढला आणि सहजच फरशीचा आतापर्यंतचा प्रवास रमाच्या डोळ्यासमोर आला. सारवणापासून तर ग्लेझ्ड टाईल्सपर्यंतचा. रमा तिसरी-चौथीत असताना तिच्या वडिलांची बदली एका खेड्यात होती. तिथली शाळा उंच गोडाऊनसारखी होती. इथे फरशी नव्हती. शेणाने सारवलेली जमीन होती. दर आठ दिवसाने जमीन सारवावी लागायची. त्याकामी लागणारं शेण ठराविक मुली मुलं गोळा करून आणायची. सारवणाला लागणारं पाणी पण ही ठराविकच मुलं विहिरीवरून आणायची. सारवणाऱ्या मुली परकराला काचा मारून सारवायच्या. बादलीत कालवलेला लगदा मुलं त्यांच्यापुढे टाकत रहायची, ह्या सरासरा सारवत जायच्या. हा कार्यक्रम सहसा मधल्या सुट्टीत चालू व्हायचा. तोपर्यंत वर्ग शाळेपुढच्या पिंपळाखाली भरायचा. वर्गात बसण्यापेक्षा बाईंनी आपल्यालाही त्या सारवणाच्या दिव्य सोहळ्यात सहभागी होऊ द्यावं असं रमाला फार वाटायचं. पण तो योग कधी आला नाही. सारवलेली जमीन दुसऱ्या दिवशी हिरवीगार दिसायची. शेणाचा वास पूर्ण वर्गात भरलेला असायचा. एक विलक्षण थंडावा वर्गात जाणवायचा. वर्गाची झाडझूड पण ह्या ठराविक मुलींकडे असायची. पसापसा भरून केर निघायचा. भरपूर केर असला की मुलींना झाडायला मजा वाटायची. त्या झाडण्यावरून मुलींमधे बरीच भांडणं चालायची. सारवलं की दोन तीन दिवस जमिन गुळगुळीत दिसायची. नंतर तिचे पापुद्रे टवके टवके करून उडायचे.. की आठ दिवसात पुन्हा सारवावं लागायचं. ही शेणाने सारवलेली जमिन उबदार असायची. हिवाळ्यात पण खालून कधी गार लागायचं नाही. कोणाकडून चुकून पाणीबिणी सांडलं तरी सोशिक गृहिणीसारखी ती शोषून घ्यायची. पाणी सांडलंय आणि त्यावरून कोणी पाय सटकून पडलंय असंही कधी व्हायचं नाही.

त्यानंतर शहाबादी फरशी आली. काहीशी ओबडधोबड पण त्यातल्या त्यात त्याकाळी तिला बऱ्यापैकी मान होता. ओबडधोबडपणामुळे हिच्यावरून पाय सरकायचा, पण प्रमाण कमी. नंतर पॉलीश्ड शहाबादी आली. नंतर टिपक्या टिपक्याच्या मोझॅक फरशा आल्या. मातकट, मळकट, मळखाऊ रंगाच्या. त्यातही नंतर पांढऱ्यावर टिपके असलेल्या आल्या. दरम्यान मार्बलची पण फॅशन येऊन गेली. आणि आता ग्लेझ्ड टाईल्सवर हा प्रवास विसावला आहे. ग्लेझ्ड टाईल्स पुसायला सोप्या, दिसायला चकचकीत, आकर्षक, पण चुकून जरी पाणी पडलं आणि तुमचं लक्ष नसेल तर 'कंबरमोक्ष' ठरलेला.

मातीची जमिन आणि ह्या टाईल्सप्रमाणेच स्त्री जीवनही हळूहळू बदलत गेलं. मातीमोल स्त्रीजीवनाला शिक्षणामुळे मोल आलं. स्त्रीयांचं आयुष्य पॉलिश्ड होत गेलं. उंबरा ओलांडून समाजात वावरण्याने तिच्या चेहऱ्यावर ग्लेझ्ड टाईल्ससारखी चकाकी आली. यंत्रयुगात यंत्रांचा वापर करत तिने रोजच्या तिच्या सारवणासारख्या आयुष्यात स्वतःच बदल घडवून आणले. ती आता सांडलेले पाणी शोषून घेत नाही तर मॉब फिरवून पटकन मोकळी होते. दोन्ही तिन्ही पिढ्यांचा, नात्यगोत्यांचा समन्वय साधताना गरीब बिचारी न रहाता विचारी रहाण्यावर भर देते. स्वतःच्या व्यक्तीमत्वाचे टवके उडणार नाही ह्याकरताही दक्ष रहाते.

विचाराच्या आवर्तात रमा गुरफटून गेली. तोपर्यंत पुष्पाचं हेलिकॉप्टर उडनछू झालं होतं...सारखं काय जुन्याचंच कौतुक? नव्याने कौतुक कोणी करायचं?




# करोना विषयी काळजी

आपल्याला सर्वांना माहितीच आहे की, मार्च २०२० मध्ये भारतच नाही तर पूर्ण जग करोना ह्या महामारीच्या विळख्यात सापडले आणि पूर्ण जनजीवन ठप्प झाले, विस्कळीत होऊन गेले. कधी विचारही केला नव्हता अशी परिस्थीती आपल्या सगळ्यांपुढे आली आणि अजूनही ह्या महामारीचे सावट गेलेले नाही. सध्या केसेस आपल्याला कमी ऐकायला येत आहेत, पण अजूनही मनात भीती आहेच की तिसरी लाट आली तर काय होणार? तिची तीव्रता किती असणार? असे एक ना अनेक प्रश्न सगळयांच्या मनात असणारच आहेत. पहिल्या आणि दुसऱ्या लाटेत बऱ्याच जणांनी आपल्या जवळच्या व्यक्तींना गमावले. पहिल्या लाटेच्या वेळेस सरकारने लॉकडाऊन जाहीर केले आणि सगळं जीवन चार भिंतीच्या आत बंदिस्त झाले. कोणाशी बोलणं नाही, भेटणं नाही. माणूस हा समाजशील प्राणी आहे. त्याला समाजात, चार लोकांत मिसळायला आवडते. एकमेकांना भेटून विचारांची देवाण घेवाण करून त्याला आपल्या समस्या सोडवायला मदत होते. पण करोनामुळे ह्या गोष्टी ठप्प झाल्या आणि माणूस आतल्या आत कुढायला लागला, गुदमरायला लागला. बऱ्याचजणांना आपल्या नोकऱ्या गमवाव्या लागल्या किंवा कमी पगारावर काम करावे लागले. अशा एक ना अनेक गोष्टी करोनामुळे झाल्या. त्याचा त्याला मानसिक ताण येऊ लागला. त्यामुळे त्याला भिती, चिंता, नैराश्य अश्या सगळ्या गोष्टींनी घेरले गेले.

अशा ह्या सगळ्या गोष्टीतून लोकांना बाहेर काढण्यासाठी व त्याच्या मनातील भिती दूर करण्यासाठी के.ई.एम. हॉस्पिटल संशोधन विभाग पुणे आणि इम्पॅक्ट युके यांच्या सहयोगाने पुणे ग्रामीण/शहरी भागामध्ये करोना विषयीची काळजी हा प्रकल्प/अभ्यास हाती घेण्यात आलेला आहे. ह्या प्रकल्पाअंतर्गत एक हेल्पलाईन सुरू करण्यात आलेली आहे. ही हेल्पलाईन २४X७ चालू आहे. ह्या सेवेअंतर्गत लोकांना त्यांच्या मानसिक समस्या/अडचणी सोडवण्यासाठी मानसोपचार तज्ञ मदत करतात.तसेच ह्या हेल्पलाईन अंतर्गत आणखी तीन वैद्यकीय क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शनाची सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे. त्यामध्ये स्त्रीरोगतज्ञ, बालरोगतज्ञ आणि जनरल मेडिसीन तज्ञ हे आपल्या शंका, प्रश्न याविषयी मार्गदर्शन करतील. त्यासाठी त्याचे दिवस व वेळ ठरवलेली आहे, ती पुढीलप्रमाणे-स्त्रीरोगतज्ञांशी तुम्ही मंगळवारी २ ते ४ ह्यावेळी तुमच्या शंका प्रश्न विचारू शकता. बालरोगतज्ञांशी गुरुवारी २ ते ४ ह्यावेळी आणि जनरल मेडिसीन तज्ञांशी शनिवारी २ ते ४ ह्या वेळी तुमच्या शंका, प्रश्न विचारू शकता. ह्या प्रकल्पाअंतर्गत आम्ही खेड तालुक्यातील २६ आदिवासी गावे निवडलेली आहेत. तेथील लोकांपर्यंत आरोग्याच्या सुविधा लवकर पोहचत नाही किंवा वाहनांची सुविधा नसल्यामुळे त्यांना लवकर आरोग्य सुविधा मिळत नाही.निदान आरोग्य सुविधांपर्यंत पोहचेपर्यंत प्रथमोपचार तरी देता येईल हा त्या मागचा उद्देश. तसेच फिरत्या दवाखान्याद्वारे आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करून आम्ही आरोग्य सुविधा त्यांच्या दारापर्यंत पोहोचवत आहोत. ह्यामध्ये डॉक्टर, सोशल वर्कर आणि मानसोपचारतज्ञ अशी आमची टिम आहे. आरोग्य तपासणी शिबिराबरोबरच गावातील लोकांना करोना, लसीकरण ह्याविषयी माहिती देऊन जनजागृती करतो. ह्यासाठी त्याच गावातील आशाताईला प्रशिक्षण देऊन त्यांना प्रशिक्षीत केले आहे. त्या ह्या जनजागृतीचे काम करतात. तसेच आरोग्य सुविधा अभावी प्राण गमवावे लागू नये म्हणून ह्या प्रकल्पाअंतर्गत ऑक्सीजन कॉन्सन्ट्रेटर मशीन देण्यात आलेले आहेत. ते प्राथमिक आरोग्य केंद्र व सबसेंटरला ठेवण्यात आलेले आहे. गावातील ज्या व्यक्तींना गरज आहे आणि पैशाअभावी ही सुविधा घेता येत नाही अशा सर्वांना ही सुविधा मोफत उपलब्ध करून दिलेली आहे. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र आणि गाव पातळीवर पीपीई किटचे वितरण ह्या प्रकल्पाअंतर्गत करण्यात आलेले आहे. त्यामध्ये सॅनिटायझर, मास्क, ग्लोव्हज्चा समावेश आहे. जेणेकरून जास्तीत जास्त आपल्याला काळजी घेता येईल. ह्या प्रकल्पाच्या माध्यमातून जनजागृती करून ह्या महामारीवर कसे नियंत्रण मिळवता येऊन आपणांस पुन्हा पूर्वीप्रमाणे आपले जीवन जगता येईल हाच ह्या प्रकल्पाचा उद्देश आहे. अधिक माहितीसाठी टोल फ्री/हेल्पलाइन नंबर वर संपर्क साधा : १८००-३०९-२१०१.

●●





के.ई.एम. हॉस्पिटल संशोधन विभाग, पुणे

# ZEE LUXURY JEWELLERY

Samruddhi Jewellers, Pune is now 'ZEE Luxury Jewellery'.

ZEE Luxury Jewellery has a 25 years of legacy spanned over three generations. The brand has evolved from creating some of the finest ornaments to conjuring up the choicest bespoke creations for the style conscious in the 21st century.

From a humble beginning, the modest acorn swiftly matures into a robust oak tree. Going beyond being the jeweller of choice for families, ZEE Luxury Jewellery has developed into a flourishing enterprise, one that endures as the mark of a new breed. Young and pioneering, the House's passion for creating avant-garde pieces leaves its patrons mesmerised, time after time.

Backed by a rich legacy and 25 years' worth of tradition, the men behind the brand are driven by a thirst for ingenuity. Apart from arresting collections that embrace contemporary muses, what keeps ZEE Luxury Jewellery resilient through changing tastes and times is their acknowledged eye for great design, coupled with consistent attention to detail.





At ZEE Luxury Jewellery, the belief that ornaments are an expressive way of articulating personality and even moods drives its designs. That's why the brand does not merely manufacture its jewels which are created with love and passion.

ZEE Luxury Jewellery has been hand held with hope, trust, products crafted with passion, keeping the trend in mind and the durability to serve Indian woman's desire. We are proud of every ornament which goes out of ZEE Luxury Jewellery. We are one of the most preferred name when it comes to Gold & Diamond Jewellery Collection in India. ZEE Luxury Jewellery have retail outlets in Mumbai (Zaveri Bazaar) and Pune.

ZEE Luxury Jewellery is committed to providing our customers the best value, quality, service and selection of jewellery in the world. With years of experience, our founders have an unprecedented record and reputation for bringing quality jewellery to some of the world's most prestigious stores. Now bringing it directly to you-affording our customers the opportunity for beautiful jewellery at incredible saving. Our dedication to our clients and insight into their needs has earned us the reputation of being one of the most respected and trusted players in the jewellery industry.

ZEE LUXURY JEWELLERY always stand by its promise & commitment:

1) Complete Transparency
2) Assured Lifetime Free Maintenance
3) Zero Deduction on Gold Exchange
4) 100% BIS Hallmark Gold
5) Guaranteed Buyback
6) Fair Price Policy
7) Responsibly Sourced Products
8) Fair Labor Practices

**Ankit Vagrecha :-**
Ankit, a 2nd generation jeweller, has a keen sense of detail in design with great grip and understanding of the key needs of the current market. Under Ankit, ZEE has seen tremendous growth across Gold & Diamond Jewellery collections. His vision marks the start of our retail outlet in Pune. Being a 2nd generation jeweller, he understand the current vibe and now expanding ZEE Luxury Jewellery to digital outlet, where customers will easily be buying jewellery online.

**Amit Vagrecha :-**
Amit, a 2nd generation jewellers has helped ZEE Luxury Jewellery with critical decision making and think out-of-the-box ideas. He has developed a strong connect with vendors, employees and other partners of ZEE Luxury Jewellery. His astute acumen of jewellery, has helped ZEE Luxury Jewellery to move fast and take appropriate decisions.

**Vishal Dayma :-**
Vishal brings his vast experience of 15+ years in the jewellery industry to put various process in place. Vishal has helped to set core processes in the company which has helped seamless growth of the brand across Mumbai and Pune.

**Ranu :-**
Ranu's involvement with ZEE Luxury Jewellery has set standards for employees in the team. She looks after all the HR and People management related tasks in the company. Her understanding of the requirement and hiring specific people at right place has helped the growth by motivating employees.

# आवर – सावर...!!!



कविता उमराणी, पुणे
editorial@thebeingwoman.com

आमच्या घरात आवरायला सुरुवातच मुळी कुठून करावी हे आजकाल कळत नाही. तसंच हा लेख लिहिताना झालं...

कशी सुरुवात करावी बरं? असा विचार करत असतानाच लेक हातातला स्कार्फ मिन्स ती आज कालची ती भली मोठी ओढणी आणि पर्स सोफ्यावर भिरकवत म्हटली, 'आई तुला आवरावरी वर सुरुवात सुचत नाही?' मनात म्हटलं, 'ती ओढणी सोफ्यावर भिरकावून तूच सुरुवात सुचवलीस ग बायो...!'




ही आवरासावरी करणाऱ्या असंख्य बायका ह्या भूतलावर असतील त्यातलीच मी एक अट्टल! हो, अट्टल चोर वगैरे असतात ना तशी मी सराईत आवरासावरीवाली बाई... पण ह्याचं सगळं काही श्रेयं आमच्या घरच्यांना जातं बाई... आमच्या सासूमा कायम कौतुकत असतात, 'आमची सून म्हणजे भारीच चूटचुटीत, खटपटीत.... सगळ काही तीचं पटीत पटीत!' पण ह्याचं देखील श्रेय आमच्या घरच्यांनाच जातं हे मी नम्रपणे मान्य करते हो!

ओले टॉवेल, पेपर, पर्स, ओढण्या, ड्रॉवरची उघडी दारं, किल्ल्या, नेलकटर, डबे, हेल्मेट, चार्जर हे सगळं उचलून उचलून बाई मी अगदीच तरबेज झालीये कामात! आमच्या घरात... घेतला वसा... नाही हो... त्याप्रमाणे म्हणजे वसा घेतल्याप्रमाणे घेतली वस्तू टाक तिथेच आणि मी दिसली वस्तू ठेव जागेवर... हे सगळं करताकरता माझी मीच स्पर्धक, माझ्या माझ्यातच चढाओढ... आता कित्ती आवरू आणि काय काय आवरू... एकदमच सुपर वूमन.

मग कितीदातरी लोकांनी प्यायलं पाणी की लगोलग भांडं उचलल्याशिवाय मला बाई राहवतच नै... बरेचदा तर अहो आणि सासूमा जेवण चालू असताना मी आशाळभूतपणे त्यांच्याकडे बघत बसते (जेवणासाठी नाही हो) कधी एकदा ह्यांचं जेवण होतंय अन् मी ताटं आवरतीये... सासूमा आमच्याकडे आल्या, की त्यांच्या तोंडात नामस्मरण इतकंच, 'अगंग थांब थांब हे उचलू नकोस मला लागणार आहे.' त्यांचा जीव मी वस्तू पटकन उचलीन म्हणून घाबरा आणि माझा मला ती वस्तू तिथेच पडून म्हणून डबल घाबरा... तर हा नाद खुळा असा की मला शेजारच्याच्या दाराला सणावरी लावलेला तोरण तसाच सुकलेला बघूनही जीव माझा वेडा पिसा...

एकदा एका डॉक्टरांच्या ओपिडीवर गेले असताना लेकीने फोन केला, 'लागला का नंबर आई?' माझं उत्तर, 'शारदा इथे केवढ्या फायली अस्ताव्यस्त पडल्यात गं बाई.' माझं मलाच नंतर हसू आवरेना, लेक नक्की विचारणार आता, 'वैशुताई (माझी डॉक्टर मैत्रीण), आई दुसऱ्यांच्या घराची सुकलेली तोरण काढायला लागली, की मग आपल्याला आईचं काऊन्सेलिंग करायला लागेल ना गं...!' जोक्स अपार्ट...

प्रत्येकच बाईच्या आयुष्यात हे आवराआवरी प्रकरण अनिवार्य असतं अगदी विधिलिखित, कोणाचं प्रमाण कमी कोणाचं जास्त इतकंच. बाई कितीही मोठ्या पदावर असो की गृहिणी, नात्याने कोणीही असो, वयाने कितीही असो आवर–सावर तिला चुकली नाही आणि पिढी कितीही बदलली तरी तिला ते चुकणार नाही.

इसापनीती तात्पर्य : आयुष्यात आवरणं आणि एखाद्याला सावरून घेणं हे फक्त एक बाईच करू शकते... म्हणूनच ही आवर–सावर हवीच!

---

हिन्दु संस्कृतीमध्ये अनेक सण समारंभप्रसंगी महिलांकडुन पुरुषांना औक्षण करुन ओवाळले जाते. महिलाही काही प्रसंगी महिलांना ओवाळतात. परंतू पुरुषांनी आईला, बहिणीला, पत्नीला ओवाळण्याची प्रथा नाही. अक्षदा विवाह–पुनर्विवाह संस्थेतर्फे आणि नुतन परिवारातर्फे पुरुषांनी दिपावली निमित्तानं महिलांना ओवाळण्याची प्रथा गेली ९ वर्षे जोपासली आहे. स्त्रियांना मान दिला जावा, त्यांचेही कौतुक व्हावे, त्यांना समानतेची वागणुक मिळावी व त्यांचा आदर केला जावा, त्यांच्याकडे वैषयिक भावनेने बघीतले जाऊ नये यासाठी हा उपक्रम राबवला जातोय. यावर्षी शांतीदुत परिवाराचेही सदस्य व पदाधिकारी या अनोख्या उपक्रमात सहभागी झाल्याने विशेष आनंद वाटला. मिलिंद जोगळेकर, सौ.आरती घुले, दुर्गा शुक्रे, एकपात्री अभिनेत्री अंजली जगताप, सिनेअभिनेत्री व निवेदिका मेघना झुझुम, सौ.अपर्णा व्होरा, सौ.सुनंदा डेरे, डॉ. विठ्ठल जाधव, माजी तुरुंग महानिरिक्षक, राष्ट्रवादी काँग्रेस पुणे शहर उपाध्यक्ष डॉ. सुनिता मोरे, चंद्रशेखर चव्हाण, समाजसेविका पौर्णिमा गादिया आदी मान्यवर उपस्थित होते.











जाहिरातीसाठी संपर्क :- ९८५०९४४२१९












Regd. Newspaper - RNI No. MAHMAR/2019/78753
(Decl. No. SDM/Pune City/SR/30/2020)
Licence to post without pre-payment of postage No.
Postal Reg. No.
Publication Date : 01/12/2021
Posting 'Every Fortnight' at

To,

'बिइंग वुमन' हे पाक्षिक मालक, प्रकाशक व मुद्रक रोहिणी अरुण वांजपे यांनी एकविरा पब्लिसिटी, ए १२, निखिल पार्क 'सी' सोसा., माणिकबाग, सिंहगड रोड, पुणे - ४११०५१ येथे छापून फ्लॅट नं. सी ११, संगिता सीएचएस, ताडीवाला रोड, पुणे - ४११००१ येथून प्रसिध्द केले. संपादक - रोहिणी अरुण वांजपे (प्रसिध्द केलेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही).
'Being Woman' Fortnightly publication is owned, Printed and Published by Rohini Arun Wanjpe, printed at Ekvira Publicity, A 12, Nikhil Park C Soc., Manikbaug, Sinhgad Road, Pune - 411051 and published at Flat No. C11, Sangita CHS, Tadiwala Road, Pune - 411001. Editor - Rohini Arun Wanjpe.



प्रिया फुलंब्रीकर, पुणे
editorial@thebeingwoman.com

# भेदक नजरेचा बुद्धिवंत!

दोन वर्षांपूर्वी नवरात्रोत्सवाच्या कालावधीमध्ये मी दिल्लीत असताना बंगाली दुर्गापूजेचे एका मंडळातर्फे निमंत्रण मिळाले. हा आवडता विजयोत्सव असल्यामुळे मी आनंदाने त्या निमंत्रणाचा स्वीकार केला व श्रीललिता पंचमीच्या सुमुहूर्तावर तिथे दर्शनासाठी गेले. सुंदर कारागिरी केलेल्या त्या मंडपात श्रीदुर्गामातेपुढे अखंड धुपारती तेवत ठेवल्यामुळे सर्वत्र धुपाचा सुगंध भरून राहिला होता. त्यामुळे तेथील वातावरण अधिकच भक्तिमय झाले होते. महिषासुरमर्दिनी श्रीदुर्गामातेचे दर्शन घेतल्यावर सभोवतालच्या विविध खाण्याच्या व वस्तूंच्या स्टॉल्सना भेट द्यावी या विचाराने तिथे गेले, तोच एका दागिन्यांच्या स्टॉलने माझे लक्ष वेधून घेतले. तो परंपरागत बंगाली पद्धतीच्या कोरीवकाम केलेल्या दागिन्यांचा स्टॉल होता आणि तिथे माझ्या अत्यंत आवडत्या पक्ष्याचे म्हणजे घुबडाचे चित्र असलेले निरनिराळे दागिने विक्रीस ठेवले होते. मी हर्षभरीत होऊन ते सुंदर कलाकुसरीचे दागिने बघू लागले. तसेच तिथल्या काही स्टॉल्सवर घुबडाच्या लाकडी प्रतिमादेखील बरेच जण विकत घेत असताना पाहिले. घुबड हे देवी लक्ष्मीचे वाहन म्हणून बंगालमध्ये अत्यंत शुभ मानले जाते, हे माहीत होते व त्या उत्सवात तर मला ते प्रत्यक्षच अनुभवायला मिळाले. हा श्रद्धाभाव या सुंदर पक्ष्याच्या संवर्धनासाठी पूरक वाटला. पण मला लगेच एक विरोधाभास तीव्रतेने जाणवला तो म्हणजे आपल्या देशातच एका राज्यात घुबड पवित्र मानले जाते तर इतर बरेच ठिकाणी त्यास अपवित्र ठरवून, अशुभ मानले जाते. कारण काय तर घुबड हा पक्षी रात्री कार्यरत असतो आणि त्याचा वास जुनाट, निर्जन, पडक्या वास्तू यांमध्ये असतो. या अंधविश्वासाला जगातील भयपटदेखील खतपाणी घालताना दिसतात. चित्रपटातील सस्पेन्स अधिक गहिरा व्हावा आणि रात्रीच्या भयप्रद वातावरणाला उठाव यावा म्हणून वटवाघळे या प्राण्यांसारखेच बिचाऱ्या घुबडाला पण चित्रपटांमध्ये वापरले जाते. त्यामुळे तर घुबडाला बघताक्षणी अनेकांच्या मनात आधी भीतीचीच भावना उत्पन्न झालेली दिसून येते.

मी पुणे शहरात मध्यवर्ती वस्तीत जरी लहानाची मोठी झाले तरी निसर्गप्रेमींच्या निसर्गपूरक घरात निसर्गाच्या सान्निध्यात वाढले. घरास चौफेर अंगण व अंगणात बाग आणि घराच्या मागील बाजूस भरपूर झाडी अन् त्यामागे महाराष्ट्रीय मंडळ शाळेचे भले मोठे पटांगण होते. घरात कासव, मासे असे पाळीव प्राणी होते. मागच्या गॅलरीत मांजरांचा वावर असायचा, तर मागच्या जिन्यात भटकी कुत्री झोपायला यायची. घराच्या पुढच्या वळचणीला एक नकटे वाघूळ कायम दिवसा मुक्कामास असायचे तर बाजूच्या वळचणीला अनेक चिमण्या व कबुतरे वास्तव्यास असायची. पहाटे उजाडायच्या व दिवेलागणीच्या समयी होणारा त्या चिमण्यांचा चिवचिवाट अजूनही मनात घर करून राहिला आहे. घराच्या मागील बाजूस मंडळाच्या शाळेच्या भिंतीत तर एक मोठी पोपटांची ढोली होती त्यात शेकडो हिरव्या राव्यांची कुटुंबे राहून गेली. मागील अंगणात डाळींब, पारिजात, चाफा, शेवगा, नारळ अशी झाडे होती त्यावर सदोदित असंख्य पक्षी व खारींचा वावर असे. अंगणात विहिरीभोवतीच्या झाडोऱ्यात नाकतोडे, चतुर, फुलपाखरे, पतंग, मुंगूस, सरडे, बेडूक, टोड यांची हमखास भेट घडायची. मागच्या दारातला शेवगा तर खूप उंच गेला होता. सुट्टीच्या दिवसांत त्या शेवग्याखाली सर्व मुले गप्पागोष्टी करायला जमत असत. त्या शेवग्यावर संध्याकाळच्या वेळी एक गव्हाणी घुबडाची जोडी येऊन बसायची. त्यातील एक घुबड आधी येऊन एका फांदीवर बसायचे तर थोड्या वेळाने त्याचा जोडीदार यायचा व जरा उंच फांदीवर येऊन बसायचा. संधीकालच्या प्रकाशात त्यांच्या पांढऱ्या आकृत्या अत्यंत सुंदर व रेखीव दिसायच्या. उंचावरून त्यांचे लक्ष जमिनीवर असायचे. ते दोघे तिथून



टेहाळणीच करायचे, असं वाटायचं. शेवग्याखाली आम्हा लहान मुलांचा खेळ किंवा नुसत्या गप्पा अगदी रंगात आलेल्या असायच्या अन् क्षणार्धात त्यातील एक घुबड जमिनीवर झेप घ्यायचे तेव्हा त्याच्या तोंडात पकडलेले सावज दिसायचे. अनेकदा उंदीर व बेडूक चोचीत पकडलेले दिसायचे तर कधी पाल व ढब्बी घूस पकडलेली दिसायची. आम्ही खेळात किंवा गप्पागोष्टींमध्ये इतके तल्लीन झालेलो असायचो की, तो प्राणी कधी बाजूला आला याचे आम्हाला भानदेखील नसायचे. इतक्या उंचीवर बसलेल्या या तीक्ष्ण व भेदक नजरेच्या घुबडांना तो प्राणी कसा बरोबर दिसला, या गोष्टीचे अप्रूप वाटायचे. हळूहळू अंधार गडद होऊ लागल्यावर तर चांदण्यांच्या प्रकाशात ही घुबडे अजूनच सुंदर दिसायची. कधीतरी मध्यरात्री गाढ झोपेत असताना यांचा तीव्र स्वरातला घुत्कार ऐकू यायचा, तेव्हा मात्र त्या अवचित ऐकू येणाऱ्या आवाजाने धडकी भरायची व डोक्यावर पांघरूण ओढून आम्ही मुलं झोपी जायचो. पण सगळ्यांना या घुबडांच्या रोजच्या दर्शनाची इतकी सवय झाली होती की कधी जोडीतील एखादेच झाडावर आले तर दुसरे कुठे गेले अशी चुटपुट लागायची. हळूहळू आमच्या भागात लोकांची वर्दळ व वस्ती वाढू लागली. आमच्या घराच्या दोन्ही बाजूची जुनी घरे जाऊन त्याजागी नवीन इमारती बांधल्या गेल्या व मंडळाच्या शाळेने पण पटांगणात भव्य इमारत बांधली. त्यामुळे त्या शेवग्यासकट बरीचशी झाडी गेली व त्यांवर वास्तव्यास येणारे किंवा नुसती हजेरी लावणारे प्राणी-पक्षी हळूहळू कमीकमी होत गेले. कित्येक वर्षे झाली शेवगा गेल्यापासून आता ती घुबडांची जोडी काही अंगणात हजेरी लावत नाही, पण उन्हाळ्यात क्वचित दिवसा गव्हाणी घुबड व कधीतरी पिंगळ्याचे दर्शन घडते. घुबड आल्याची वार्ता कावळे, साळुंक्या, बुलबुल असे पक्षीगण टिपेच्या सुरात कर्कशपणे ओरडून देतात तेव्हा हा अस्सल शिकारी पक्षी सळो की पळो झाल्यासारखे या झाडावरून त्या झाडावर उडताना दिसतो. बहुधा हा छोट्या पक्ष्यांच्या पिल्लांच्या किंवा बागेत सुळसुळाट करणाऱ्या उंदरांच्या टोळीतील सावज पकडण्यास आलेला असतो.

'जीवो जीवस्य जीवनम्' या निसर्गाच्या नियमानुसार निसर्ग साखळीत भक्ष्य व भक्षक हे नाते महत्वाचे आहे. घुबड हा अन्न साखळीत महत्वाची भूमिका बजावणारा पक्षी आहे. घुबड नसेल तर निसर्गात साप, सरडे, पाली, मासे, उंदीर, घुशी यांची संख्या बेसुमार वाढेल. निसर्गाने या संख्येवर निसर्गतः ताबा मिळवण्याकरिता घुबडाच्या रूपातून योजना केलेली आहे.

घुबड हा तीक्ष्ण कर्णेंद्रिय लाभलेला पक्षी आहे. तो अत्यंत बुद्धिमान असून कोणताही सूक्ष्म आवाज ऐकण्याची क्षमता त्यास निसर्गाने बहाल केलेली आहे. त्यामुळे जमिनीवरील व जमिनीतील भक्ष्यदेखील घुबड लीलया हुडकून काढू शकतं. घुबड हा भेदक नजरेचा असून त्याची मान २७० अंशात वळू शकते त्यामुळे कोणतेही सावज घुबडाच्या नजरेतून सुटू शकत नाही. परदेशात घुबडास बुद्धिवान समजले जाते. पिकासोच्या चित्रांसारखेच त्याने पाळलेले घुबडदेखील प्रसिद्ध झाले होते.

घुबड हा झाडांच्या ढोलीत राहणारा निशाचर पक्षी त्याच्या पिल्लांचं जोडीने खूप सुंदररित्या संगोपन करतो. त्याची ढोलीतून एकामागून एक येऊन झाडाच्या फांदीवर एकमेकांस चिकटून बसणारी पिल्लेदेखील अगदी गोजिरवाणी दिसतात.

जैवविविधतेने संपन्न असलेल्या भारतामध्ये घुबडाचे असंख्य प्रकार दिसून येतात; परंतु या आधुनिकतेचे वारे वाहणाऱ्या काळातही भारतात अनेक ठिकाणी अंधश्रद्धेचा जबरदस्त पगडा आहे आणि त्यामुळे या निष्पाप पक्ष्यांचा निर्दयीपणे बळी दिला जातो. निसर्गाबाबत डोळस दृष्टिकोन ठेवून अंधश्रद्धेवर मात केल्यास भारतात घुबड या गुणी व बुद्धिवान पक्ष्याचे नक्कीच उत्तम संवर्धन होईल.

यावर्षीच्या दिवाळी उत्सवामध्ये लक्ष्मी पूजनाच्या दिवशी श्रीलक्ष्मी देवीची पूजा केली जाईल त्यावेळी देवी लक्ष्मीच्या घुबड या वाहनाबद्दल मनात प्रेमभावना आणून यापुढे समाजात घुबडांबद्दल सजगता आणण्यासाठी प्रयत्नशील राहूया!

**(लेखिका ह्या निसर्ग संरक्षण व संवर्धनाकरिता स्थापन करण्यात आलेल्या ग्रीन बर्ड्स अभियानाच्या संस्थापक आहेत.)**

••

बिइंग वुमन
Pune's only Fortnightly for Women
Follow us on :-

